हैं तय्यार हम...

मी धावणार माझ्यासाठी

Brought to you by SAFFRON LANDMARKS
Aurangabad Maha Marathon
A LOKMAT INITIATIVE
17 Dec 2017
21km
Associate Sponsor RiSO
Powered by DHOOT TRANSMISSION
#MahaMarathon /MahaMarathon

मराठवाड्याची राजधानी असलेल्या ऐतिहासिक औरंगाबाद शहरात खूप गुणवंत खेळाडू आहेत. खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे काम नेहमीच 'लोकमत' वृत्तपत्र समूहाने केले आहे. मागील वर्षीपासून मॅरेथॉन स्पर्धा घेण्यात येत आहे. या स्पर्धेमुळे शहराचे नाव राज्य आणि देशपातळीवर उंचावत आहे. स्पर्धेत मी स्वत: पण धावणार असून, आरोग्यासाठी धावणे खूप आवश्यक आहे.
-डी. एम. मुगळीकर, मनपा आयुक्त.

क्रेडाई ग्रुप... १७ डिसेंबर रोजी औरंगाबाद महामॅरेथॉनमध्ये धावण्यासाठी सज्ज असलेले क्रेडाई ग्रुपचे सदस्य - (डावीकडून) नितीन बगडिया, आर. एफ. पाटील, नीलेश अग्रवाल, बालाजी येरावार, संग्राम पटारे, विकास चौधरी, आशुतोष नावंदर, रवी वट्टमवार, भास्कर चौधरी, अनिल अग्रहाकर, अखिल खन्ना, पंजाबराव तौर, प्रशांत कंठवार, गोपेश यादव आणि रोहित सूर्यवंशी.

फेथ बिल्ड कन्स्ट्रक्शन... १७ डिसेंबर रोजी औरंगाबाद महामॅरेथॉनमध्ये धावण्यासाठी सज्ज असलेले फेथ बिल्ड कन्स्ट्रक्शनचे सदस्य - (डावीकडून) कृष्णा कुलकर्णी, दीपेश नाईक, गणेश ताठे, रोहितदास कापडणीस, शब्बीर कागझी, राजेंद्र पाटील, स्वराज पाटील, ॲड. बाळासाहेब वाघमारे, चंद्रकांत देशपांडे, भालचंद्र रत्नपारखी, जगदीश पाटील आणि राजू शेळके.

ग्रुप बुकिंगसाठी त्वरा करा

महामॅरेथॉनमध्ये आपला सहभाग लवकरात लवकर निश्चित करावा. ही नोंदणी लोकमत भवन, रिगल लॉन, जालना रोड येथे सकाळी ११ ते सायं. ५ वाजेपर्यंत करता येईल. या स्पर्धेत शाळा, महाविद्यालये, कंपनीमधील कर्मचारी, रनर्स ग्रुपही एकत्रितरीत्या सहभाग घेऊ शकतात. या महामॅरेथॉनच्या नोंदणीत जास्तीत जास्त धावपटू, नागरिकांनी सहभाग नोंदवावा.

अधिक माहिती व ग्रुप बुकिंगसाठी ९९२१०३०७००, ०२४०-३०२१७०८ या क्रमांकावर संपर्क साधावा. या महामॅरेथॉनमध्ये नोंदणी ऑनलाइनही करता येईल. त्यासाठी धावपटूंनी www.mahamarathon.com या संकेतस्थळावर जावे.

स्पर्धा
- Half Marathon - 21 Kms
- Power Run - 10 Kms
- Fun Run - 5 Kms
- Family Run - 3 Kms

सहारा युवा मंचतर्फे मूकबधिर विद्यार्थ्यांना पेन वाटप

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : सहारा युवा मंचतर्फे भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद जयंतीनिमित्त साजरा करण्यात येणाऱ्या शिक्षणदिनी (दि.११) कर्णबधिर तसेच मूकबधिर विद्यार्थ्यांना पेन वाटप करण्यात आले.

मंचच्या सदस्यांनी मौलाना आझादांच्या जीवनकार्याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी सहारा युवा मंचचे संयोजक अब्दुल रहीम, शोएब खान, अब्दुल अजीम फारुकी, जमीर, मोहसीन, एहसान आदींची उपस्थिती होती.

निःशुल्क डोळ्यांची तपासणी वय ४० व त्यापुढील
13 नोव्हेंबर 2017 रोजी सकाळी 10 ते 6
EYE Q
आय-क्यू सुपर स्पेशॅलिटी नेत्र रुग्णालय
निशुल्क मधुमेह व रक्तदाब तपासणी
पहिला मजला, साई बिझनेस सेंटर, हॉटेल यशोदीप शेजारी, सेव्हन हिल उड्डान पुलाजवळ, जालना रोड, औरंगाबाद. संपर्क : 0240-6600443.
मोतिबिंदू । रेटिना । लेसिक । काचबिंदू । जनरल आय चेकअप । औषधे । ऑप्टिकल्स

दावा : सुटीच्या दिवशीही होणार नोंदणी, ३ गावांची खरेदी प्रक्रिया पूर्ण

भूसंपादन लवकर करणार

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : समृद्धी महामार्गाच्या भूसंपादनाचे काम जिल्ह्यामध्ये सुरू असून, त्यासाठी शेतकऱ्यांचे सहकार्य मिळत आहे. जिल्ह्यात समृद्धीसाठी भूसंपादनाचे १६०० हेक्टरचे लक्ष्य असून, त्यापैकी सुमारे ३०० हेक्टर जमीन ताब्यात घेण्यात आली आहे. शेतकऱ्यांना मोबदला देऊन उर्वरित भूसंपादनाची प्रक्रिया दोन आठवड्यांत पूर्ण होईल. तीन गावांतील खरेदी प्रक्रिया पूर्ण झाल्याचा दावा जिल्हाधिकारी नवल किशोर राम यांनी केला.

भूसंपादन वेगाने पूर्ण व्हावे यासाठी सुटीच्या दिवशीही नोंदणी व मुद्रांक कार्यालय सुरू ठेवण्यात आले आहे. शनिवारी शेवगा, जळगाव फेरण, जयपूर, अब्दीमंडी, कोलठाण या गावांतील ११ शेतकऱ्यांची रजिस्ट्री प्रक्रिया जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पार पडली.

यावेळी जिल्हाधिकारी म्हणाले की, प्रारंभी भूसंपादन प्रक्रियेत अडचणी निर्माण झाल्या, पण सद्य:स्थिती वेगळी आहे. आता शंभर टक्के शेतकरी जमीन देण्यास तयार आहेत. शासनातर्फे योग्य मोबदला शेतकऱ्यांना मिळत आहे, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. शेतकऱ्यांना जमिनीची किंमत, प्रतवारी किंवा वर्गवारीबाबत काहीही शंका असल्यास त्याचे निरसन करण्यासाठी मी स्वत:, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आणि कर्मचारी तत्पर असतील.

जिल्ह्यात ११ नोव्हेंबरपर्यंत झालेल्या खरेदी खतांचा तपशील

तालुका	एकूण लाभार्थी	एकूण क्षेत्र	झालेली खरेदी	मिळालेले क्षेत्र	उर्वरित खरेदी	उर्वरित क्षेत्र
वैजापूर	११३०	४५३.१९१७	१६०	८९.८९१६	९७०	३६३.३००१
गंगापूर	४६६	२३९.३५८७	३८	३३.७७४७	४२८	२०५.५८४०
औरंगाबाद	१४५८	५५५.११४५	११८	७३.१२०३	१३४०	४८१.९९४२
एकूण	३०५४	१२४७.६६४९	३१६	१९६.७८६६	२७३८	१०५०.८७८३

'त्या' शिक्षकांना न्यायालयाचा दिलासा

सेवा सातत्य, वेतन संरक्षण : शिक्षण उपसंचालकांचा निर्णय औरंगाबाद खंडपीठात रद्द

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : खाजगी अनुदानित शाळेतील प्राथमिक शिक्षकपदाचा राजीनामा देऊन महापालिकेच्या शाळेत रुजू झालेल्या शिक्षकांना 'सेवा सातत्य आणि वेतन संरक्षण' देण्यास नकार देणारा शिक्षण उपसंचालकांचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्या. एस. व्ही. गंगापूरवाला आणि न्या. एस. एम. गव्हाणे यांनी रद्द केला.

याचिकाकर्त्यांनी पूर्वीच्या सेवेचा राजीनामा दिला असला तरी त्यानंतर योग्य ती परवानगी घेऊन त्यांची नियुक्ती झाली असल्यास त्यांची पूर्वीची सेवा रद्द होत नाही, अशी तरतूद आहे. त्यामुळे प्रतिवादींनी याचिकाकर्त्यांच्या विनंतीचा विचार करावा, असे निर्देश देत खंडपीठाने याचिका मंजूर केली.

याचिकाकर्ते वसंत राठोड व इतर हे बळीराम पाटील या मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेत सहशिक्षक म्हणून १९८९ ते १९९६ पर्यंत काम करीत होते. त्यानंतर राजीनामा देऊन ते लगेचच १९९६ साली महापालिकेच्या शिक्षण विभागात रुजू झाले. त्यांच्या दोन्ही ठिकाणच्या सेवेत खंड नसून त्यांनी पूर्वपरवानगी घेतली आहे. त्यांना पूर्वीच्या शाळेतील सेवा सातत्य व वेतन संरक्षण न मिळाल्यामुळे त्यांना वेतनात नुकसान होत आहे. १८ जून १९७७ च्या शासन निर्णयानुसार इतर शिक्षकांना १९९६ आणि २०११ मध्ये वेतन संरक्षण दिले होते. म्हणून याचिकाकर्त्यांनी २०१५ मध्ये खंडपीठात याचिका दाखल केली असता याचिकाकर्त्यांच्या निवेदनावर तीन महिन्यांत निर्णय घेण्याचे सुचविले होते व कागदपत्रे दाखल करण्याची मुभा दिली होती.

मनपा उपायुक्तांनी यासंदर्भात शिक्षण उपसंचालकांनी मार्गदर्शन करण्याची विनंती केली. उपसंचालकांनी 'महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ च्या नियम ४६ (१) नुसार कर्मचाऱ्याने सेवेचा किंवा पदाचा राजीनामा दिल्यास पूर्वीच्या सेवेचा हक्क गमावला जातो, अशी तरतूद असल्याचे कळवून याचिकाकर्त्यांची विनंती अमान्य केली. म्हणून याचिकाकर्त्यांनी ॲड. संभाजी मंडे यांच्यामार्फत खंडपीठात याचिका दाखल करून वरील नियमातील नियम ४६(२) मधील तरतुदीनुसार योग्य ती परवानगी घेऊन नियुक्ती झाली असल्यास त्यांची पूर्वीची सेवा रद्द होत नाही, याकडे खंडपीठाचे लक्ष वेधले.

सातारा येथील खंडोबा मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कामाला मनपाने सुरुवात केली. त्यावेळी महापौर नंदकुमार घोडेले, ट्रस्टचे अध्यक्ष साहेबराव पळसकर, सायली जमादार व अधिकारी.

खंडोबा यात्रेनिमित्त मनपा सुविधा पुरविणार

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : चंपाषष्ठीनिमित्त सातारा खंडोबा यात्रेपूर्वी पाणी, रस्ते, आरोग्य आणि पथदिवे लावण्यासाठी प्राधान्य देण्याचे आदेशही महापौरांनी अधिकाऱ्यांना दिले. अवघ्या १२ दिवसांवर यात्रोत्सव आला असताना कोणतीही सेवा-सुविधा मनपाने पुरविली नसल्याचे वृत्त लोकमतने प्रसिद्ध केले होते. त्या वृत्ताची दखल घेत कामाला सुरुवात केली आहे.

रस्त्याचे काम हाती घेऊन घोडेले यांनी रविवारपासूनच सुविधांच्या कामांना प्राधान्य दिले. यावेळी नगरसेविका सायली जमादार, वॉर्ड अभियंता पी. जी. पवार, विद्युतचे अभियंता के. डी. देशमुख, वॉर्ड अधिकारी मनोहर सुरे, ट्रस्टचे अध्यक्ष साहेबराव पळसकर यांची उपस्थिती होती. सोमवारी मनपा आयुक्तांसह सर्व विभागाच्या प्रमुखांनी यात्रेच्या तयारीला लागावे, यात्रेकरूंना कोणताही त्रास होणार नाही, याची दक्षता घेणार असल्याचे आदेश महापौर घोडेले यांनी दिले.

दरोड्याच्या गुन्ह्यात चौघांना सश्रम कारावास

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : फिर्यादीला गंभीर जखमी करून साडेचार लाख रुपये लुटणाऱ्या चौघा आरोपींना सत्र न्यायाधीश एच.एस. महाजन यांनी गुरुवारी दरोड्याच्या आरोपाखाली प्रत्येकी पाच वर्षे सश्रम कारावास व प्रत्येकी एक हजार रुपये दंड ठोठावला.

कांता बाबूराव कांबळे (५०) राहणार राधामंगल कार्यालय सातारा परिसर यांच्या आजोबाला पदमपुरा शिवारातील एक एकर १५ गुंठे जमीन युसुफुद्दीन मगरबी यांनी १९७२ साली पाच रुपयांच्या बॉन्डपेपरवर विक्री केली होती. जमीन ही रेल्वेस्थानक परिसरातील एस. टी. च्या जागेजवळ आहे. या जमिनीवर २००६ मध्ये एस.टी. आणि मनपाने जमिनीवर कब्जा करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान फिर्यादीचे अजोबा मयत झाल्याने दिवाणी न्यायालयात फिर्यादीने दावा दाखल केला. यावर न्यायालयाने सदर जमीनीचे ४ लाख ५२ हजार दंड भरून नोंदणी करून घेण्याचे आदेश दिले. दरम्यान १६ ऑक्टोंबर २००९ मध्ये न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार चलनाची रक्कम घेऊन जाण्यासाठी फिर्यादी जमीनीवर गेले असता वाचमन म्हणुन सुनील जाधव हे राहत होते. आरोपी गुलाब व त्यांच्या अल्पवयीन दोन्ही मुले सुनीलला मारहाण करतांना दिसले. त्यामुळे तिथे फिर्याद गेला असता त्यासही आरोपींनी लाकडी दांड्याने मारहाण केली. तोच आणखी तिघे रमेश, दिपक आणि राजेंद्र साबळे हे तिथे आले असता त्यांनी फियार्दीला जबर मारहाण करत वाचमनच्या खोलीत ठेवलेली पैशांची बॅग पळवली. सहाही आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. प्रकरण सुनावणीस आले सहाय्यक सरकारी वकील मधुकर आहेर यांनी सहा साक्षीदार तपासले. चार आरोपींस ५ वर्ष सक्तमजुरी, महिला कैदेची शिक्षा सुनावली. आरोपीत गुलाब दगडु लव्हे (५५), रमेश नाथाजी साबळे (४२), दिपक रमेश साबळे (१८), राजेंद्र रमेश साबळे (१९) , विधीसंघर्ष दोन मुलांचा समावेश आहे. हे सर्व राजू नगर रेल्वेस्थानक परिसरात राहतात.

लोकप्रिय कलाकारांना भेटण्याची अनोखी संधी

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : विविध मराठी मालिका आणि चित्रपटांमध्ये सकस अभिनय करून मराठी प्रेक्षकांच्या मनात विशेष स्थान पटकावणारा अभिनेता अंकुश चौधरी, अभिनेत्री तेजस्विनी पंडित, स्पृहा जोशी आणि अमित राज बुधवारी दि. १५ नोव्हेंबर रोजी एका विशेष कार्यक्रमाच्या माध्यमातून सखींच्या भेटीला येत आहेत. सोनी मसाले या कार्यक्रमाचे सहप्रायोजक आहेत.

लोकमत लॉन, लोकमत भवन येथे सायं. ५ वाजता या बहारदार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. निमित्त आहे या त्रिकुटाच्या लवकरच प्रदर्शित होणाऱ्या 'देवा' या चित्रपटाचे.

या चित्रपटाबाबत जाणून घेण्याची संधी तर तुम्हाला मिळणारच आहे, पण याशिवाय अंकुश, स्पृहा आणि तेजस्विनी खऱ्याखुऱ्या आयुष्यात कसे आहेत, त्यांचे आगामी चित्रपट कोणते, त्यांच्या आवडीनिवडी कोणत्या याविषयीही तुम्हाला जाणून घेता येईल.

सदाबहार गीतांचा कार्यक्रम

- गप्पाटप्पांसोबत बहारदार सुरांची सोबत तर आहेच. गुलाबी थंडीत आपल्या लाडक्या कलाकारांसोबत मराठी, हिंदी, नव्या-जुन्या सदाबहार गाण्यांचा आस्वाद घेण्याची संधी अजिबात न दवडता मोठ्या संख्येने कार्यक्रमास उपस्थित राहा. प्रवेश मागील गेटने. ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक.

लोकमत सखी मंच

Govt Reg.No.7342
पेन केअर इंस्टीट्युट
ऑर्थोपेडीक सर्जन द्वारे सल्ला व उपचार

सांधेवात, गुडघेदुखी, मान, पाठ, कंबरदुखी मायग्रेन (डोकेदुखी), फ्रोझन शोल्डर (खांदेदुखी) सायटीका, स्लिप डिस्क, टाचदुखी, टेनिस ऐल्बो हातापायात मुंग्या येणे
अपना बाजार, बाफना ज्वेलर्स समोर, जालना रोड, औरंगाबाद.
9822899660, 9422713387, 9767442040
(कृपया अपॉईंटमेंट घेऊनच येणे)
सोमवार ते शुक्रवार फक्त

पोलीस, महसूल कर्मचाऱ्यांच्या विरोधात निवेदन

वाळू वाहतूक संघर्ष समिती : १४ डिसेंबर रोजी काढणार मोर्चा

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : महाराष्ट्र राज्य वाळू वाहतूक संघर्ष समितीने विभागीय आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर यांना विविध मागण्यांचे निवेदन दिले. जिल्ह्यातील पोलीस प्रशासन आणि महसूल विभागातील अधिकारी त्रास देत असून, बेकायदेशीर कारवाई करतात. त्यांच्या विरोधात कारवाई करण्याच्या मुख्य मागणीसाठी १४ डिसेंबर रोजी संघटना मोर्चा काढणार आहे.

जिल्ह्यातून सुमारे ५ हजार वाळू वाहतूकदार मोर्चात सहभागी होणार असल्याचा दावा संघटनेचे कार्याध्यक्ष शेख अश्पाक पटेल यांनी केला. पटेल यांनी सांगितले, अधिकृत वाहतूक करणाऱ्यांना पोलीस आणि महसूलमधील काही अधिकाऱ्यांकडून त्रास दिला जातो.

वाळू वाहतूकदारांकडे कायद्याप्रमाणे सर्व परवाने असतात, तरीही पोलीस व अधिकारी गौण खनिज वाहतुकीच्या गाड्या अडवितात. भादंवि ३७९ अन्वये वाहतूकदारांवर कारवाई केली जाते. त्या कारवाईचा उद्देश प्रामाणिक नसतो. राज्यभरात कुठेही अशी कारवाई होत नाही. फक्त औरंगाबाद हद्दीमध्ये कारवाई होत आहे.

पोलिसांना वाहतूकदारांवर कारवाई करण्याचे अधिकार नाहीत. ३७९ या कलमानुसार पोलीस वाहतूकदारांवर वाळू चोरीचे गुन्हे दाखल करतात. उच्च न्यायालयाने यापूर्वी या कलमाखालील गुन्हे चुकीचे ठरविलेले आहेत.

या सगळ्या जाचातून वाहतूकदारांना न्याय मिळावा, यासाठी मोर्चा काढण्यात येणार असल्याचे पटेल यांनी सांगितले.

आता प्रथमच सेक्स समस्यांवर अत्याधुनिक विदेशात प्रचलित लेझर व व्हॅक्युम थेरेपी उपचार
विवाहापुर्वी व विवाहानंतर समस्यांसाठी एम.बी.बी.,एस.एम.डी. डॉक्टरांचा सल्ला
हस्तमैथुन, स्वप्नदोष, विर्यदोष, शिघ्रपतन, इंद्रीय शिथिलता, पुरुष वंधत्व
हायपोगोनॅडिझममुळे इंद्रीय समस्या, मधुमेहामुळे आलेली लैंगिक शिथीलता
ऑलीगोस्पर्मीया : शुक्रजंतुची संख्या कमी असणे. ॲझुस्पर्मीया: शुक्रजंतुची संख्या अजीबात नसणे.

आशाकिरण क्लिनीक
१९८५ पासुन शास्त्रीयोक्त मार्गदर्शन केंद्र
३८, निराला बाजार, बाटा शोरुम समोर, औरंगाबाद. वेळ - स.११ ते ३ व सायं.७ ते ९ शनिवार रविवार बंद
कृपया अनावश्यक खर्चीक व फसव्या उपचारापासुन सावध मो. 7769856821 9767132521

साहित्यिक नाराज : पुस्तकांच्या किमती दुपटीने वाढणार

पुस्तकांवर जीएसटी म्हणजे मुळावरच घाव

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : आजपर्यंत कोणत्याही सरकारने लेखक, कवी किंवा अन्य कोणत्याही कलाकारांना कोणत्याही 'कर'चक्रात अडकवलेले नव्हते. पुस्तकांवर कोणताही जीएसटी नाही, असे सरकारच्या वतीने जाहीर करण्यात आले आहे; पण कलाकारांच्या मानधनावर (रॉयल्टी) लागू करण्यात आलेला जीएसटी आणि पुस्तकनिर्मितीच्या प्रत्येक टप्प्यावर लावण्यात आलेले वेगवेगळे जीएसटी दर यामुळे सरकारने मुळावरच घाव घालण्याचा अप्रत्यक्षपणे प्रयत्न केला आहे, अशी तीव्र नाराजी व्यक्त करणारी प्रतिक्रिया शहरातील साहित्यिकांनी दिली.

कागदावर ५ टक्के, छपाईवर १२ टक्के, लॅमिनेशनवर १८ टक्के, बायंडिंगवर १८ टक्के जीएसटी लागू करण्यात आल्यामुळे एका पुस्तकाची किंमत ३० ते ४० टक्क्यांनी वाढलेली आहे. याशिवाय लेखक, मुद्रितशोधक यांना मिळणाऱ्या मानधनावर प्रत्येकी १८ टक्के जीएसटी आकारण्यात आला आहे. या बदलांमुळे एखादे पुस्तक काढण्यासाठी प्रकाशकाला पुस्तक निर्मितीसाठी लागणाऱ्या खर्चाच्या पाऊणपट अधिकची रक्कम जीएसटीवर खर्च करावी लागणार आहे. त्यामुळे पुस्तकाची किंमत जवळपास दुपटीने वाढणार असल्यामुळे या सगळ्याचा परिणाम निश्चितच पुस्तक खरेदीवर होणार असल्याचे मत साहित्यिकांनी व्यक्त केले.

सोशल मीडियावर वेगवेगळ्या ॲपच्या माध्यमातून विविध पुस्तके ऑनलाइन वाचण्याची सुविधा उपलब्ध असल्यामुळे पुस्तक विकत घेऊन वाचण्याची संस्कृती आधीच कमी होत चालली आहे. यामध्ये जर पुस्तकांच्या किमती दुपटीने वाढल्या तर पुस्तक विकत घेण्याचे प्रमाण निश्चितच कमी होईल.

पुस्तक खरेदीवर प्रतिकूल परिणाम

या सर्व गोष्टींचा पुस्तक खरेदीवर निश्चितच प्रतिकूल परिणाम होणार आहे. मुळात पुस्तके ही ज्ञानाशी संबंधित गोष्ट आहे. जीएसटीमुळे मुळावरच घाव घालण्याचा प्रयत्न शासनाने केला आहे. यामुळे प्रकाशकही अडचणीत येणार. यामुळे या निर्णयाच्या विरोधात जर कुणी काही प्रयत्न करत असेल, तर आम्ही त्यांना पाठिंबा देऊ.

- **कौतिकराव ठाले पाटील,** अध्यक्ष, मराठवाडा साहित्य परिषद

पुनर्विचार व्हावा

कोणत्याही राष्ट्राच्या प्रगतीसाठी साहित्य, संस्कृती किंवा अन्य कोणत्याही कला निश्चितच महत्त्वपूर्ण ठरतात. या सगळ्या ज्ञानशाखा आहेत. कला म्हणजे व्यापार नाही, हा विचार करून या निर्णयावर पुनर्विचार व्हावा. मागच्यावर्षीही पुस्तक विक्री कमी झाली. आता पुन्हा या सगळ्या गोष्टींचा फटका प्रकाशकाला आणि वाचकांना बसण्याची शक्यता आहे.

- **बाबा भांड** (ज्येष्ठ साहित्यिक)